10-06-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/9/2025 10:42 PM Page 1

निवडक

पेडणे : कबड्डी प्रीमियर लीगचे विजेत्या किंग्स युनाइटेड संघ व उपविजेता साई शक्ती संघ. सोबत मान्यवर.

पेडणे कबड्डी प्रीमियर लीगचे किंग्ज युनायटेड किंग्सला जेतेपद

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ८ : पेडणे आदर्श युवा संघ आणि उदरगत मांद्रे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पेडणे कबड्डी लीग दुसऱ्या हंगामाचे विजेतेपद किंग्स युनाइटेड संघाने पटकवले. त्यांना रोख चाळीस हजार आणि चषक तर उपविजेत्या साईशक्ती संघाला रोख वीस हजार व चषक देण्यात आले. सदर स्पर्धा सावळवाडा इनडोअर स्टेडियमवर संपन्न झाली.ह्या कबड्डी लीगमध्ये एकूण सहा संघ सहभागी झाले होते.
या स्पर्धेचा अंतिम सामना युनाइटेड किंग्स आणि साई शक्ती यांच्यात ४१ – ४१ गुणांनी ड्रॉ झाला. सुपर पाच रेडमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावत किंग्स युनायटेड संघाने हा सामना ४७ – ४५ अशा फरकाने जिंकला.सामना बराच अटीतटीचा झाला होता.
साखळी पद्धतीने खेळविण्यात आलेल्या या लीगमध्ये युनाइटेड किंग्सने सर्व सामने एकतर्फी जिंकले होते. पण अंतिम सामन्यात साई शक्ती संघाने पहिल्या मध्यापर्यंत २४ – १० अशा गुण फरकाने आघाडी घेतलेली. परंतु युनाइटेड किंग्स संघाचा रेडर कर्णधार भार्गव मांद्रेकरच्या जिगरबाज खेळाच्या जोरावर संपूर्ण सामना पलटला. पूर्ण वेळेपर्यंत ऐकूण ३१ रेड पॉईंट्सची कमाई करीत युनाइटेड किंग्स संघाने हा सामना ४१ – ४१ असा अनिर्णीत स्थितीत आणून सोडला.
पिकेएल सीजन दोनमध्ये भार्गव मांद्रेकरने एकूण ६५ रेड पॉईंट्सची कमाई केली व पाच सामन्याचा सामनावीर पुरस्कार पटकवण्याचा विक्रम केला. त्याच्या या तुफानी खेळीबद्दल भार्गव मांद्रेकर याला पिकेएल सीजन दोनचा मालिकावीर म्हणून मांद्रे मतदार संघांचे आमदार जीत आरोलकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेतील उत्कृष्ट चढाई म्हणून हरीश जल्मी आणि उत्कृष्ट पकड म्हणून रामा वेळीप यांना गौरविण्यात आले.

इंग्लंड कसोटीपूर्वी भारतीय संघावर संकट

सराव करताना मॅचविनरला गंभीर दुखापत | मालिका २० जूनपासून सुरू

बेकेनहॅम, दि. ९ :

१८ वर्षांची प्रतीक्षा संपवण्यासाठी, टीम इंडियाने इंग्लंडच्या भूमीवर पाऊल ठेवले आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या नवीन आवृत्तीच्या सुरुवातीसाठी टीम इंडिया या देशात पोहोचली आहे, जिथे त्यांना इंग्लंडविरुद्ध ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळायची आहे. ही मालिका २० जूनपासून सुरू होणार आहे, परंतु टीम इंडियाने सुमारे २ आठवड्यांपूर्वीच आपला कॅम्प सुरू केला आहे आणि सराव देखील सुरू केला आहे. परंतु सरावाच्या पहिल्याच दिवशी नेटमध्ये एक छोटासा अपघात झाल्याने भारताला मोठा धक्का बसला आहे.

भारतीय संघ शुक्रवारी, ६ जून रोजी इंग्लंडला पोहोचला. त्यानंतर, टीम इंडियाने एक दिवस विश्रांती घेतली आणि त्यानंतर ७ जून रोजी, खेळाडूंनी लॉर्ड्सवर हलके फिटनेस ड्रिल करून हवामानाशी जुळवून घेतले. रविवार, ८ जूनपासून टीम इंडियाने लंडनपासून १५–१६ किमी अंतरावर असलेल्या बेकेनहॅम या छोट्याशा शहरात कौशल्य सराव सुरू केला. ग्रेटर लंडन काउंटी अंतर्गत येणाऱ्या या शहरात टीम इंडिया सुमारे १० दिवस तयारी करेल.

शिबिराच्या पहिल्या दिवशी एक अस्वस्थ करणारे दृश्य पाहायला मिळाले, जेव्हा संघाचा स्टार यष्टीरक्षक–फलंदाज ऋषभ पंतला दुखापत झाली. रेव्हस्पोर्ट्सच्या वृत्तानुसार, पंतला फलंदाजी करताना ही दुखापत झाली, जेव्हा एक चेंडू त्याच्या डाव्या हाताला कोपरजवळ लागला. पंत वेदनेने त्रस्त दिसत होता आणि लगेचच नेटपासून दूर झाला. वैद्यकीय पथकाकडून त्याच्या वेदना कमी करण्यासाठी आणि सूज टाळण्यासाठी लगेच 'आईस पॅक' लावण्यात आला.

पंतची ही दुखापत किती गंभीर आहे, याबद्दल सध्या फारशी माहिती नाही. अहवालात असे म्हटले आहे की बर्फ लावल्यानंतर पंतच्या हातावर पट्टी बांधण्यात आली आणि नंतर तो नेटपासून वेगळा झालेला पाहायला मिळाला. अहवालानुसार, दुखापतीपूर्वी पंत फलंदाजी करत असतानाही तो फार चांगल्या लयीत दिसत नव्हता आणि २–३ वेळा बाद झाला, तर त्याने काही संधीही गमावल्या.

सरावादरम्यान रिषभ पंतला दुखापत

रोहित शर्मा, विराट कोहली आणि रविचंद्रन अश्विन यांच्या निवृत्तीनंतर भारतीय कसोटी संघ थोड्या कमजोर अवस्थेत दिसत आहे. आता यामध्येच इंग्लंड विरुद्ध कसोटी मालिकेआधी टीम इंडियाला एक मोठा झटका बसण्याची शक्यता आहे. सुपरस्टार यष्टिरक्षक फलंदाज आणि टीम इंडियाचा उपकर्णधार रिषभ पंत सराव सत्रादरम्यान दुखापती झाला आहे. अशा परिस्थितीत तो पहिला हेडिंग्ले मधील कसोटी सामना खेळणार की नाही यामध्ये संशय निर्माण झाला आहे.

इंग्लंड विरुद्ध पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेआधी टीम इंडिया आता इंग्लंडला पोहोचली आहे. जिथे संघाने सराव सुद्धा सुरू केला आहे. रेवस्पोर्ट्सच्या एका रिपोर्टनुसार सराव सत्रादरम्यान रिषभ पंतला दुखापत झाली आहे, ज्यानंतर तो त्रासात दिसून आला. त्यानंतर त्याला डॉक्टरांच्या टीमसोबत पाहण्यात आले. सध्या त्याची दुखापत खूप जास्त मोठी दिसून येत नाही. रिषभने या दुखापतीनंतर सराव केला नाही. तो रिकव्हरी करत आहे. दिग्गज खेळाडू टीम इंडियातून निवृत्त झाल्याने आता रिषभ पंत देखील खूप महत्त्वाचा खेळाडू ठरणार आहे. त्यामुळे त्याची दुखापत टीम इंडियासाठी डोकेदुखी ठरू शकते.

स्टार फलंदाज रिषभ पंत पहिला कसोटी सामना खेळणे टीम इंडियासाठी अत्यंत महत्वाचे आहे. पहिला कसोटी सामना २० जून पासून सुरू होणार आहे. सध्या संघाकडे ११ दिवसांचा वेळ आहे. त्यामुळे रिषभ पंत सामना खेळू शकतो. जर रिषभ पंतने जर सामना खेळला नाही तर यष्टिरक्षक फलंदाज ध्रुव जुरेल प्लेइंग इलेव्हनमध्ये सामील होऊ शकतो.

श्रेयस अय्यर व्हाईट–बॉल कर्णधारपदाच्या शर्यतीत

मुंबई, दि. ८ :

आयपीएल २०२५ हंगामात पंजाब किंग्जला अंतिम फेरीत पोहोचवणारा श्रेयस अय्यर आता भारताच्या व्हाईट – बॉल कर्णधारपदाच्या शर्यतीत अधिकृतपणे सामील झाला असल्याची माहिती बीसीसीआयच्या सूत्रांनी दिली आहे. बीसीसीआयच्या केंद्रीय करार यादीत नसतानाही अय्यरला आगामी मर्यादित षटकांच्या नेतृत्वासाठी गंभीर दावेदार मानले जात आहे.

पंजाब किंग्जला आयपीएल ट्रॉफी मिळवता आली नसली तरी अय्यरचा संयमी आणि प्रेरणादायी नेतृत्वशैलीचा प्रभाव संघावर स्पष्टपणे जाणवला. याआधी २०२४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सला विजेते बनवलेल्या अय्यरला या हंगामापूर्वी संघातून वगळण्यात आले होते. मात्र, पंजाबकडून नेतृत्व करताना त्याने संघर्ष करणाऱ्या फ्रँचायझीला अंतिम फेरीपर्यंत पोहोचवून आपली नेतृत्वक्षमता पुन्हा सिद्ध केली.

सध्या अय्यर केवळ एकदिवसीय सामन्यांमध्ये खेळतो, पण या आयपीएलमधील कामगिरीनंतर त्याला टी–२० आणि कसोटी सामन्यांपासूनही दूर ठेवणे कठीण होईल. तो आता अधिकृतपणे व्हाईट–बॉल कर्णधारपदाच्या शर्यतीत असल्याची क्रिकेट जगतात चर्चा आहे.

सध्या भारताच्या तीन वेगवेगळ्या संघांची सूत्रे विविध खेळाडूंमध्ये विभागली गेली आहेत . यामध्ये रोहित शर्मा (एकदिवसीय), सूर्यकुमार यादव (टी–२०), आणि शुभमन गिल (कसोटी). मात्र, बीसीसीआय या विभाजित नेतृत्व व्यवस्थेला दीर्घकालीन पर्याय मानत नसून, एकत्रित व्हाईट–बॉल कर्णधाराच्या नियुक्तीचा विचार सुरू आहे.

रोहित शर्माच्या संभाव्य निवृत्तीच्या पार्श्वभूमीवर आणि सूर्यकुमार यादवच्या एकदिवसीय संघात स्थान न मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर अय्यरकडे नेतृत्वासाठी प्रमुख पर्याय म्हणून पाहिले जात आहे. विशेषतः त्याची एकदिवसीय क्रिकेटमधील सातत्यपूर्ण कामगिरी यासाठी निर्णायक ठरू शकते.

गेल्या वर्षीच्या विश्वचषक संघात अय्यरचा समावेश नव्हता, मात्र त्यानंतरच्या कालावधीत त्याने आपल्या फॉर्ममध्ये सातत्य राखले आहे. त्यामुळे आगामी टी–२० संघात त्याचे पुनरागमन जवळपास निश्चित मानले जात आहे.

दरम्यान, इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या १८ सदस्यीय संघातून अय्यरला वगळण्यात आले होते. मात्र, मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी स्पष्ट केले होते की अय्यरने देशांतर्गत क्रिकेटमध्ये कामगिरी केली, तर त्याला पुन्हा कसोटी संघात संधी दिली जाईल. अय्यरच्या नेतृत्वगुणांना आणि फलंदाजीतील स्थैर्याला लक्षात घेता, त्याचे नाव केवळ मर्यादित षटकांचे नेतृत्वच नव्हे, तर आगामी काळात भारतीय क्रिकेटमधील महत्त्वाच्या भूमिकांसाठीदेखील चर्चेत राहण्याची शक्यता आहे.

वेस्ट इंडिजसाठी 'करो या मरो' स्थिती

नवी दिल्ली, दि. ९ :

इंग्लंड क्रिकेट टीमने मायदेशात वेस्ट इंडिज विरुद्ध एकदिवसीय मालिका एकतर्फी फरकाने जिंकली. इंग्लंडने विंडीजचा ३ सामन्यांच्या मालिकेत ३–० अशा फरकाने धुव्वा उडवला. त्यानंतर ६ जूनपासून उभयसंघातील टी २० आय मालिकेला सुरुवात झाली. इंग्लंडने या ३ सामन्यांच्या टी २०ख मालिकेत विजयी सलामी दिली. इंग्लंडने पहिल्या सामन्यात विंडीजवर मात करत १–० अशा फरकाने आघाडी घेतली. त्यामुळे इंग्लंडसमोर दुसरा सामना जिंकून मालिका जिंकण्याची दुहेरी संधी आहे. त्यामुळे या दुसऱ्या सामन्यात कोण बाजी मारणार? हे पाहणे औत्सुक्याचं ठरणार आहे.

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील निराशाजनक कामगिरीनंतर जोस बटलर याने इंग्लंडच्या कर्णधारपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर हॅरी ब्रूक याची इंग्लंडच्या वनडे आणि टी २०ळ संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती केली. हॅरीने कर्णधार म्हणून शानदार सुरुवात केली आणि इंग्लंडला पदार्पणातील मालिका क्लीन स्वीपने जिंकून दिली. तर त्यानंतर इंग्लंडने ६ जून रोजी विंडीज विरुद्ध पहिल्या टी २०ळ सामन्यात २१ धावांनी विजय मिळवला. इंग्लंडचा हा हॅरी ब्रूक याच्या नेतृत्वातील विंडीज विरुद्धचा सलग चौथा विजय मिळवला.

त्यामुळे आता इंग्लंडकडे विंडीज विरुद्ध सलग पाचवा सामना जिंकून टी २०ळ मालिका जिंकण्याची संधी आहे. तर दुसऱ्या बाजूला विंडीजसाठी दुसरा सामना हा करो या मरो असा आहे. विंडीजला या मालिकेतील आव्हान कायम राखण्यासाठी विजय मिळवणं बंधनकारक आहे. त्यामुळे विंडीज दुसऱ्या टी २०ळ सामन्यात मैदान मारणार का? याकडे चाहत्यांचं लक्ष असणार आहे.

इंग्लंड विरुद्ध वेस्ट इंडीज यांच्यात आतापर्यंत टी २०ळ क्रिकेटच्या इतिहासात एकूण ३६ टी २०ळ सामने खेळवण्यात आले आहेत. या

कार्लोस अल्काराझला 'फ्रेंच ओपन २०२५'चे विजेतेपद

- सिन्नरला पराभूत करून अजिंक्यपद राखले
- दोन सेट गमावल्यानंतर जोरदार कमबॅक

पॅरिस, दि. ९ :

स्पेनच्या कार्लोस अल्काराझने फ्रेंच ओपन २०२५ चे विजेतेपद जिंकले आहे. विजेतेपदाच्या सामन्यात त्याचा सामना इटलीच्या यानिक सिन्नरशी होता. सिननरने पहिले दोन सेट जिंकले. त्यानंतर अल्काराझने जोरदार पुनरागमन केले आणि पुढचे तीन सेट जिंकले आणि विजेतेपद पटकावले. हे त्याचे सलग दुसरे फ्रेंच ओपन विजेतेपद आहे. त्याच वेळी, २२ वर्षीय अल्काराझचे हे पाचवे ग्रँड स्लॅम आहे.

टायब्रेकरमध्ये तीन सेटचे निकाल

कार्लोस अल्काराझने हा विजेतेपदाचा सामना ४–६, ६–७, ६–४, ७–६, ७–६ असा जिंकला. दुसरा, चौथा आणि शेवटचा सेट टायब्रेकरमध्ये निश्चित झाला. चौथ्या सेटमध्ये एका क्षणी, यानिक सिन्नर विजयाच्या जवळ आला. त्याला तीन मॅच पॉइंट मिळाले पण प्रत्येक वेळी अल्काराझने पुनरागमन केले आणि मॅच पॉइंट वाचवले. पाचव्या सेटचा निकाल सुपर टायब्रेकरमध्ये आला. यामध्ये, जो खेळाडू प्रथम १० पॉइंट मिळवतो तो जिंकतो. अल्काराझने तो १०–२ असा जिंकला.

अंतिम सामना ५ तास २९ मिनिटे चालला

ही विजेतेपदाची लढत ५ तास २९ मिनिटे चालली. फ्रेंच ओपनच्या इतिहासातील ही सर्वात लांब अंतिम फेरी आहे. ओपन युगात आतापर्यंत कोणत्याही फ्रेंच ओपनची अंतिम फेरी ५ तासांपर्यंत पोहोचलेली नाही. यापूर्वी १९८२ चा अंतिम सामना ४ तास २० मिनिटे चालला. त्या सामन्यात मॅट्स विलांडरने गिलेर्मो विलासचा पराभव केला. २०१२ मध्ये नोवाक जोकोविच आणि राफेल नदाल यांच्यात सर्वात लांब ग्रँड स्लॅम अंतिम फेरी झाली. हा सामना ऑस्ट्रेलियन ओपनचा होता.

ग्रँड स्लॅम अंतिम फेरीत अल्काराज अजिंक्य

कार्लोस अल्काराजचा हा चौथा ग्रँड स्लॅम अंतिम फेरी होता. त्याने सर्व जिंकले आहेत. त्याने २०२२ मध्ये पहिल्यांदाच यूएस ओपन जिंकले. त्यानंतर, त्याने २०२३ मध्ये विम्बल्डन जिंकले. २०२४ मध्ये, त्याने फ्रेंच ओपन आणि विम्बल्डन दोन्ही जिंकले. आता पुन्हा एकदा त्याने फ्रेंच ओपन जिंकले आहे. २३ वर्षीय सिनेरच्या नावावर तीन ग्रँड स्लॅम विजेतेपदे आहेत.

रवी शास्त्री यांच्या योगदानास मान्यता द्यावी : एमसीएला अपील

मुंबई, दि. ९ :

भारतीय क्रिकेटमधील एक अत्यंत महत्त्वाचा चेहरा असलेले माजी खेळाडू आणि प्रशिक्षक रवी शास्त्री यांना अद्याप मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए)कडून कोणताही औपचारिक गौरव मिळालेला नाही, ही बाब अनेकांच्या चिंतेचा विषय बनली आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबईचे माजी कर्णधार शिशिर हट्टंगडी यांनी एमसीएला सादर केलेल्या पत्राद्वारे रवी शास्त्री यांच्या योगदानाची आठवण करून देत त्यांच्या नावे वानखेडे स्टेडियममध्ये स्टँड नामांकित करण्याची विनंती केली आहे.

गेल्या महिन्यात एमसीएने भारताचे एकदिवसीय कर्णधार रोहित शर्मा, माजी कर्णधार अजित वाडेकर आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष शरद पवार यांचा सन्मान करत वानखेडे स्टेडियममध्ये त्यांच्या नावे स्टँड नामांकित केले होते. यापूर्वी येथे सचिन तेंडुलकर, सुनील गावस्कर आणि दिलीप वेंगसरकर यांच्या नावेही स्टँड आहेत. मात्र, आता क्रिकेटमधील रवी शास्त्री या आणखी एका दिग्गजाची आठवण करून देण्यात आली आहे

टाईम्स ऑफ इंडिया वृत्तानुसार हट्टंगडी यांनी पत्रात लिहिले आहे की, स्टेडियममध्ये गौरव मिळालेल्या व्यक्तिमत्त्वांच्या यादीतून रवी शास्त्री यांना वगळले गेले, हे आश्चर्यकारक आणि चिंताजनक आहे. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी भारताचे नेतृत्व, कामगिरी आणि प्रशिक्षक म्हणून आधुनिक क्रिकेटला आकार दिला आहे.

शास्त्री हे १९८३ मध्ये विश्वचषक जिंकलेल्या संघाचे सदस्य होते आणि त्यांच्या खेळाडू म्हणून सशक्त उपस्थितीने तसेच प्रशिक्षक म्हणून भारताला नवीन उंचीवर नेण्यात मोलाचा वाटा उचलला. विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली, शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली भारताने कसोटी क्रिकेटमध्ये जागतिक दर्जाचे यश मिळवले.

हट्टंगडी पुढे म्हणाले, ही चूक जाणूनबुजून झालेली नसली तरी, ती मुंबई आणि भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील महत्त्वाच्या अध्यायाचे दुर्लक्ष करते. शास्त्रींचा वारसा आकडेवारीत मोजता येणार नाही. त्यांच्या विचारसरणीचा, शैलीचा आणि दृष्टिकोनाचा प्रभाव व्यापक आहे.

तसेच त्यांनी नमूद केले की, प्रशासनाच्या भूमिकेचे आणि वारशाच्या जतनाचे गांभीर्य लक्षात घेऊन मी ही विनंती करतो. क्रिकेटच्या इतिहासात ज्यांनी मौल्यवान ठसा उमटवला आहे, त्यांची ओळख कायमस्वरूपी ठेवणे हे आपल्या पुढील पिढ्यांच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.

हट्टंगडी यांनी स्पष्टपणे सांगितले की, हे राजकीय विधान नसून केवळ एक सचोटीनं केलेलं निरीक्षण आहे. रवी शास्त्री यांनी आपल्या कारकिर्दीत ८० कसोटी आणि १५० एकदिवसीय सामन्यांत भारताचे प्रतिनिधित्व केले. एक विश्वासार्ह अष्टपैलू खेळाडू म्हणून त्यांनी जवळपास ७,००० आंतरराष्ट्रीय धावा केल्या आणि २८० विकेट्स घेतल्या. त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात मोठा क्षण म्हणजे १९८५ च्या बेन्सन अँड हेजेस वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये 'मालिकावीर' म्हणून झालेली निवड.

खेळ सोडल्यानंतर शास्त्री हे आघाडीचे क्रिकेट समालोचक म्हणून उदयास आले आणि नंतर भारताच्या मुख्य प्रशिक्षकपदी कार्यरत राहून त्यांनी संघात शिस्त, जिद्द आणि लढाऊ वृत्ती यांचा नवा अध्याय लिहिला.आता प्रश्न असा आहे की, एमसीए त्यांचे हे योगदान औपचारिकपणे मान्य करणार का? क्रिकेटप्रेमींच्या आणि माजी खेळाडूंच्या या अपेक्षेला संघटनेचा प्रतिसाद काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

इंग्लंड विरूद्धच्या कसोटी मालिकेत भारतीय संघात 'या' दिग्गजाची एन्ट्री

नवी दिल्ली, दि. ९ :

शुबमन गिल याच्या नेतृत्वात टीम इंडिया इंग्लंड दौऱ्यात कसोटी मालिका खेळणार आहे. टीम इंडिया इंग्लंड विरुद्ध २० जून ते ४ ऑगस्ट दरम्यान एकूण ५ कसोटी सामने खेळणार आहे. बेन स्टोक्स याच्याकडे इंग्लंडच्या कर्णधारपदाची जबाबदारी आहे. तर शुबमन गिल याच्या खाद्यांवर भारतीय संघाची धुरा असणार आहे. शुबमन गिल याची कसोटी कर्णधार म्हणून ही पहिलीच मालिका असणार आहे. रोहित शर्मा याने काही दिवसांपूर्वी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. त्यामुळे शुबमनला कर्णधार करण्यात आलंय. तसेच विराट कोहली आणि आर अश्विन या दोघांनीही टेस्टमधून रिटायरमेंट घेतली आहे. त्यामुळे शुबमनसेनेसाठी इंग्लंड विरुद्धची कसोटी मालिका आव्हानत्मक असणार आहे.

इंडिया विरुद्ध इंग्लंड यांच्यातील पहिला सामना २० जूनपासून हेंडिंग्ले लीड्स येथे खेळवण्यात येणार आहे. मात्र त्याआधी टीम इंडियात तब्बल २२ वर्षांनी एका दिग्ज्जाचं कमबॅक झालं आहे. टीम इंडियाच्या सपोर्ट स्टाफमध्ये दिग्गज परतला आहे. बीसीसीआयने याबाबतची माहिती टीम इंडियाच्या नेट्स प्रॅक्टीसच्या व्हीडिओद्वारे दिली आहे. मात्र बीसीसीआयने याबाबत अधिकृत घोषणा केलेली नाही.

कर्णधार विराट कोहली आणि कोच रवी शास्त्री ही जोडी टीम इंडियात होती तेव्हापासून स्ट्रेंथ एन्ड कंडीशनिग कोच म्हणून सोहम देसाई हे जबाबदारी पार पाडत होते. मात्र काही महिन्यांपूर्वी बीसीसीआयने सपोर्ट स्टाफमधील काही जणांना बाहेरचा रस्ता दाखवला होता. यामध्ये सोहम देसाई यांचाही समावेश होता.

त्यानंतर आता टीम इंडिया ६ जून रोजी इंग्लंडमध्ये दाखल झाली. तर ८ जूनपासून टीम इंडियाच्या नेट्स प्रॅक्टीसला सुरुवात झाली. बीसीसीआयने टीम इंडियाचा नेट्स प्रॅक्टीस करतानाचा व्हीडिओ पोस्ट केलाय. या व्हीडिओत सोहम देसाई यांच्या जागी एड्रीयन ले रॉक्स आले आहेत.

२२ वर्षांनी कमबॅक

एड्रियन ली रॉक्स याआधीही टीम इंडियाच्या सपोर्ट स्टाफचा भाग होते. एड्रियन ली रॉक्स २००२–२००३ या काळात टीम इंडियासह होते. एड्रियन ली रॉक्स यांचं त्यानंतर आता तब्बल २२ वर्षांनी कमबॅक झालं आहे. याआधी एड्रियन आयपीएलमधील टीम पंजाब किंग्ससह होते. पंजाब किंग्सला अलविदा केल्यानंतर ते आता टीीम इंडियासह असणार आहेत.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २७८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 278 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .